2018-19

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

**UGC Approved Multidiciplinary international E-research journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**23 March 2019, Special Issue- 168 (I)**

# Globalisation : Challenges and Opportunities for India

**Dr. Anil Chidrawar**
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

**Chief Editor**
**nraj T. Dhangar**
Prof. (Marathi)
Commerce college,
ashik (M.s.) India

**Executive Editor of Thi**
**Dr. Shivaji Dal**
**Principal**
Punyashlok Ahilyadevi Ho
Ranisawargaon, Tq. Ga

**Co-Editor**
**Dr. Angad Gadme**
Dept. of Sociology PAH
Ranisawargaon, Tq. Gangakhed

Prof.

Dept. of Milita
Ranisawargao

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (I) | March 2019 | UGC Approved No. 40705
Globalisation: Challenges and Opportunities for India

# जागतिकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम

प्रा. डॉ. अशोक पुरभाजी टिपरसे
संशोधन मार्गदर्शक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

प्रस्तावणा :–

आशियातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारताचा वृध्दीदर प्रत्येक कोनातून झालेला आहे. त्यात मनुष्यबळ, औद्योगीक विकास, प्रषासनाची वृध्दी इत्यादीमध्ये वाढ झालेली आहे. 90 च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी या घटकाला जास्त महत्व देण्यात आले. जागतिक इतिहासाच्या घटनेत अविस्मरणीय घटना म्हणजे गॅट करार 15 एप्रिल 1994 मध्ये 117 देशाच्या सदस्यानी त्याला मान्यता दिली संपुर्ण जगाचा विकास व्हावा असा निर्णय घेण्यात आला.

भारताच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट म्हणजे ईस्ट इंडिया कंपनी येउन आपल्या देशाची अर्थव्यवस्था गिळंकृत करून भारताला सर्वस्व गमावून भिकेला लावणारी ठरेल असे विरोधी गटाचे मत आहे तर समर्थकाचे असे कत आहे की WTO करारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास झपाट्याने होईल. या सर्व मुद्याचा नीट अभ्यासपुर्ण विचार करायला पाहिजे तो विचार केल्यानंतरच भारताने डंकेला प्रस्तावावर स्वाक्षरी करण्यात कांही चुक केली आहे काय किंवा विरोधी पक्षाचे ओरडणे सकळ्याच अर्थाचे योग्य आहे या बद्दलचे निष्कर्ष काढता येईल.

यापूर्वी आगोदर जागतिकीकरण म्हणजे काय हे समजावून घेणे आवश्यक आहे. एक हत्ती आणि पाच आंधळे गोष्टी सारखे जागतीकीकरणा बद्दलचे विचार असू शकतात. जागीकीकरण परिपुर्ण रितीने समजून घेतल्या नंतर लक्षात येईल.

जगतीकीकरण म्हणजे काय

व्याख्या – मालकॉक एसऑडिसेहिहः यांच्या मते अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे उद्योन्मुख अर्थव्यवस्थेला जागतिकीकरण परिणाम प्राप्त करून देणे होय.

(Globalisation of the economy means the global dimension of the evolving economy-Malcom S. Adiehias)

जगतीकीकरण म्हणजे भिन्न देशांनी एकमेकाजवळ येणे व्यापार व गुंतवणूक या वरील निर्बंध दुर करणे आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यक्ती वस्तू,सेवा,विचार, रितीरिवाज यांची सुलभ देवाण–घेवाण होणे या सा–या गोष्टी जागतीकीकरणाच्या प्रकियेत अभिप्रेत आहेत.

डंकेल प्रस्तावाची कोटेकोरे व योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी 15 एप्रिल 1994 रोजी अंतराष्ट्रीय व्यापार संघटनेची स थापना करण्याचे मंजूर करण्यात आले आणि त्यानुसार 1 जानेवारी1995 पासून W.T.O. ने आपल्या कामकाजास सुरूवात केली गॅटची जागा आज जागतीक व्यापार संघटनेने घेतलेली आहे. डंकेल प्रस्तावामध्ये एकुण 28 करार असून त्याची अमल बजावणी W.T.O. करीत आहे. भारत W.T.O. चा संस्थापक सभासद आहे.

**1) जागतीकीकरण व भारतीय कृषीक्षेत्र :–**

नव्वदच्या दशकाच्या सुरूवातीचे आर्थिक संकट हे अर्थ व्यवस्थेतील व्यापार जागतीकरणाच्या प्रकियेची मोददात करण्याची सुरूवात ठरते व कृषी क्षेत्रही त्यापासून वेगळे नव्हते. सन 1991 पासून जागतीक पातळीवर आर्थिक व वित्तीय क्षेत्रात व्यापक प्रमाणात बदल होउ लागल्यामुळे बदलत्त्या आर्थिक परिस्थीतीत टिकून राहण्यासाठी आपणास देखील जागतकरणाच्या प्रकियेत समाविष्ठ होण्याच्या दृष्टीने व्यापार, उद्योग, वाणिज्य, सेवा व कृषी धारेणात व्यापक प्रमाणात बदल करण्या येवू लागले. सन 1994 मध्ये उरुग्वे येथे कृषी व्यापाराच्या प्रश्नावर विविध राष्ट्रांमध्ये व्यापर चर्चा होउन वाटाघाटी झाल्या तेंव्हा पासून भारताच्या कृषी धोरणात जागतीकीकरणाच्या दृष्टीकोनातून हळूहळू बदल होण्यास सुरूवात झाली. सन 1995 पुर्वी गॅट करारातील तरतुदी कृषी क्षेत्रासाठी लागू नव्हत्या यात कांही बदल करून त्याकृषी क्षेत्रासाठी लागू करण्यात आल्या. सन 1986 साली सुरु झालेल्या वाटी घाटी 1990 मध्ये संपायला पाहिजे होत्या त्यानुसार बनवलेल्या मुद्यावर आधारीत नवा करार तयार व्हायचा व त्याची अंमलबजावणी 1993 पासून व्हायची असे अपेक्षीत होते. या नव्या करारात कृषी–व्यापार, व्यापाराला अनुसरून गुंतवणूक बौध्दीक स्वामित्वाचा हक्क, वित्तीक सहकारी व सेवा संबंधीच्या नव्या कलमाचा समावेश करण्यात आला.

**2) कृषी विषयक धोरण –**

देशांतर्गत शेत मालाचा आधार किमती बाबत जी अनुदाने दिली जातात. सन 1993 ते 1999 या काळात हळूहळू 20 टक्के घट केली पाहिजे विकसनसील देशात आधाराचे एकुंण मापन ( AMS) पध्दती नुसार ती 10 टक्के पर्यंत कमी केली पाहिजे कृषी मालाच्या निर्यातीला जे प्रत्यक्ष अर्थ सहाय्य (सबसीडी) दिली जाते त्यात सन 1993 ते 99 या काळात 24 टक्के ते 36 टक्के पर्यंत कपात करून आयात मालावरील जकाती कमी करणे. सार्वजनीक वाटप पध्दतीने जे धान्य उपलब्ध करून दिले जाते. त्यावरील अर्थ सहाय्य (सबसीडी) हळूहळू कमी करण्यात यावी.

**3) बी–बियाण्यासारख्या वनस्पती जातीसाठी पेटेंन्ट एकाधिकार :–**

या प्रस्तावानुसार वनस्पतीच्या जातीच्या (विशेषतः बी–बियाणे) पेटेंन्टचा अधिकार संशोधन कार्यात 20 वर्षे राहिल हा भाग या करारातील व्यापाराषी निगडीत बौध्दीक संपदा Trade Related Intellectual Property Rights Trips या बाबतचा आहे बी–बियाणे, खते अथवा इतर नवीन प्रकारचे संशोधन करणा–याला एकाधिकार हक्क प्राप्त होईल त्यापासून त्याला लाभ होईल इतर प्रकाराच्या बौध्दीक संपदा एकाधिकार जागतीक व्यापार संघटनेने एकुण 9 बौध्दीक संपदाचा समावेष केलेला आहे. डंकेल प्रस्तावानुसार हे सगळे बौध्दीक संपत्ती अधिकार खाजगी राहतील कृषी क्षेत्राच्या बाबतीत तर जागतीकरणाच्या प्रकियेत आपणास

परिस्थीतच्या रेट्यामुळे समाविष्ट व्हावे लागले भारत जर गॅट करारातून बाहेर पडला तर भारताला व्यापारासाठी वेगवेगळ्या
देशांशी वेगवेगळा करार करावा लागेल आणि ते भारताला परवडणारे नाही तसेच ते उपयोगाचे ही नाही.
वरील सर्व कारणामुळे भारतातील कृषी क्षेत्रावर जागतीकीकरणाचे विपरीत परिणाम होत आहे. असे असले तरी वरील
प्रक्रीयेपासून दूर राहणे शक्य नाही.

**जागतीकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम :–**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. या विषयी वाद करायला वाव नाही सन 1951–52 मध्ये शेती
वर अवलंबून असणाऱ्या लोक संख्येचे प्रमाण 70 टक्के पेक्षा जास्त होते ते आता कमी झाले आहे. हे खरे परंतु अजूनही ते प्रमाण
प्रचंड आहे. सध्या हे प्रमाण कमी होउन 54 टक्के झाले आहे. सन 1989 – 90 पासून अमेरीकेच्यादबावाखाली देशाच्या सरकारने
नवीन आर्थिक धोरण स्वीकारले आहे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतीकीकरण (खाउजा) हे नव्या आर्थिक धोरणाचे पैलू
आहेत. नव्या आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीचा गेल्या 25 वर्षाचा आणि आताही सुरु असलला हा काळ हा तीसरा टप्पा आहे.
काळाच्या या तिसऱ्या टप्प्यात कृषी क्षेत्राची दशा काय आहे? नवे आर्थिक धोरण स्वीकारन तेंव्हा त्याला ज्यांनी विरोध केला
त्यांची कुचेष्टा करण्यात आली होती. यांना नवे काही कळतच नाही असे सांगून अवहेलना करण्यात आली देशात सुबता येईल
शेतकरी सुखी, समधानी होईल ग्रामीण भाग समृध्द होईल देशाचा कॅलिफोर्निया होईल अशी स्वप्ने दाखविण्यात आली होती.
जागतीकीकरणामुळे कृषी क्षेत्राचा समतोल विकास होईल. शेतमालास योग्य भाव (मुल्य) मिळून शेतकऱ्यांच्या आर्थिक
परिस्थीतीत व्यापक बदल होईल कृषी क्षेत्रातील बारमाही रोजगार मिळेल, ग्रामीण भागातील उपलब्ध साधन सामुग्रीचा सुयोग्य
वापर होवून पुरक उद्योग व कुटीर उद्योगांचा विकास होउन खऱ्या अर्थाने बळी राजा जिवन जगेल असा विश्वास देण्यात आला.

सन 1995–52 मध्ये कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा 56 टक्के होता आज केवळ 13 टक्के इतका आहे. या स्वप्नाचा
आधार सांगितलेल्या नव्या, खाउजा आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणी नंतर आता 25 वर्षात क्षेत्रात काय घडले आहे. हे आकडे
वारीनिशी तपासता येईल योग्य निष्कर्ष काढता येईल हातच्या ककनाला आरसा लागत नाही अनुभव बोलत असतो गेल्या पाच
वर्षात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्येची सुनामी लाट असल्या सारखे वाटते जेवढ्या
शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तेवढ्या आगोदरच्या 50 वर्षात झाल्या नव्हत्या आताही वस्तूस्थीती सर्वांनी मान्य केली आहे. या
आत्महत्यांना खाउजाचे नव आर्थिक धोरण कारणीभूत आहे की नाही याची कोणाला शंका असल तर ती शेती संबंधीत आकडेवारी
तपासता येत. कृषी क्षेत्रातील गुंतवणूकीत कसा बदल होत गेला या बाजून तपास करता येतो. सन 1993–94 मध्ये एकुण राष्ट्रीय
उत्पादनच्या 1.6 टक्के इतकी गुंतवणूक घसरुन 1.3 टक्के वर आली गुंतवणुकीची दशाही नंतरही तशीच सुरु आहे. शेती व
संबंधीत क्षेत्रातील भांडवल निर्मितीत ही बिघाड झाला आहे. देशात ही एकुण भांडवल निर्मिती झाली (ग्रॉस कॅपीटलफोरमेशन)
त्यात कृषी क्षेत्राचा वाटा 1987–88 मध्ये 11.7 टक्के होता तो 1999–2000 मध्ये 7.2 टक्के वर घसरला शेतीची ही दूशा आनखीही
अनेक बाजून तपासता येईल.

**अंतर्गत सहाय्य (सबसीडी) कमी करणे**

कृषी अनुदान तीन प्रकारची आहेत. 1. पाणी, विज, खत, कर्जावरील व्याज, हमी भाव यावरची अनुदाने ॲबर (नारंगी)
सबसीडी असे म्हणतात 2. पर्यावरण संरक्षण, मार्केट सर्वे, पायाभूत सुविधा, किड, नियंत्रन यासाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिली
जाणारी नसत तीला ग्रीन (हिरवी) बॉक्स सबसीडी असे म्हटले जाते. 3. आपल्या उत्पादनाने नियंत्रण ठेवावे यासाठी दिले जाणारे
अनुदान म्हणजे ब्ल्यू (निळया बॉक्स) सबसीडी होय.

नारंगी बॉक्स मधील अनुदाने सन 1994 ते 2000 या 6 वर्षाच्या काळात 20 टक्के एवढे कमाने बंद करण्यात आले आहेत
परंतू हिरव्या व निळया बॉक्स मधील अनुदान विकसीत देश आपल्या देशातील शेती उत्पादनाचा खर्च कमीकरुन अंतरराष्ट्रीय
बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरे म्हणजे निर्यात अनुदानात विकसीत देशातील अनुदाने 6 वर्षाच्या काळात आपले
निर्यात अनुदान 36 टक्के ने कमी कराव असे ठरले डब्ल्यू.टी.आ. ने विकसीत देशातील विविध प्रकारची दिले जाणारी अनुदाने
कमी केली असली तरी हिरव्या व निळया बॉक्स द्वारे दिले जाणारी अनुदाने विकसनशील देशाच्या दृष्टीने घातकच आहे.

भारताच्या पूर्ण घरगुती उत्पादना पैकी 0.7 टक्के खर्च खताच्यास सबसीडी साठी होते. या सबडीडीतून अत्यंत अकार्यक्षम
युरीया उत्पादक फायदा होतो.

भारतातील कृषी क्षेत्राला 1995–96 मध्ये 38.5 टक्के एवढे अनुदान होते (गुलाटी 2001) भारतात कृषी उत्पादनाला (ए.एम.
एस.) द्वारे दिले जातात ज्यामध्ये प्रॉडक्ट स्पसीफीक सपोर्ट व नॉन प्रोडक्ट स्पसीफीक सपोर्ट या प्रकारची अनुदाने दिली जातात
प्रॉडक्ट स्पसीफीक सपोर्ट मध्ये प्रत्येक शेती उत्पादनकाला आधारभूत किंमत दिली जातात परंतू ए.ओ.ए. मुळे विकसनशील
देशातील सन 1994–2004 या दहा वर्षाच्या काळातील शेतकऱ्याला दिली जाणारी नारंगी बॉक्समधील सहय्यता 13.3 टक्के ने
क्रमाने कपात करावी लागणार आहे. अशा प्रकारच्या अनुदानाचे प्रमाण भारतात फारच मर्यादीत स्वरूपाचे आहे.

1. जागतीकीकरणाचा फायदा अमेरीकेसारख्या विकसीत देशातील शेतकऱ्यांना मिळत आहे. याचे एक कारण त्यांना माल कमी किंमतीत परदेशी बाजार पेठेत विकला जावा यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य (सबसीडी) देण्यात येते त्यामुळे विसनसील व गरीब देशातील शेतकरी त्यांच्याशी स्पर्धेत टिकु शकत नाही या शेतकऱ्यांचे अर्थ सहाय्य कमी न करता उलट विसनशील देशातील अर्थ सहयय कमी करावे अशी अट त्यांच्यावर लादण्यात येत आहे.

1996 मध्ये प्रत्येक शेतकऱ्यास प्रत्येकी 2600 डॉलर्स म्हणजे 14 लक्ष रुप्ये अनुदान सरकारने दिले. ही अनुदानाची रक्कम जगातील कमी उत्पन्न गटातील 42 देशाच्या दरडोई वार्षिक उत्पन्नाच्या 25 पटीने जास्त आहे.

1998 वर्षी अमेरिकेच्या सरकारने तेथील शेतकऱ्यास प्रति हेक्टर 550 डॉलर्स म्हणजे 2400 रु. अनुदान दिले. या व्यतिरिक्त खेते, इंजीन,इंधने,प्रकिया करणारे यंत्र, औषधे शेतकऱ्यास स्वस्थ दिल्या जाते. या संदर्भात पुढील आकडेवारी पुरशी बोलकी आहे. विकसीत देश शेतकऱ्यांना पुढील प्रमाणे अनुदान देतात. जपान 72.5 टक्के कोलंबिया 54.00 टक्के, द. कोरीया 61.00 टक्के, युरोप 37.0 टक्के. चीन 34.00 टक्के अमेरिका 28.8 टक्के, तर भारत 3.00 टक्के (संदर्भ , जिवनमार्ग 22 जुलै 2001 के वरदराजन अनुवाद कृष्णा खोपकर)

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (I) | March 2019 | UGC Approved No. 40705
Globalisation: Challenges and Opportunities for India

निष्कर्ष :–

जुलै 1991 पासून जे धोरण म्हणून झाले ते धोरण नव्हते कारण त्यावर निट खोलात जावून संशोधन करून चर्चा करून तज्ञाचे मार्गदर्शन ते आखले गेलेले नव्हते खरे म्हणजे इतके मोठे बदल सरकार दिर्घ कालीन धोरण म्हणून स्विकारणार असेल तर त्यावर सर्वनमत ध्यायला हवे नियोजन बध्द समाजवादी अर्थ व्यवस्था कायमची सोडून जागतीकीकरण उदरीकरण शिथीलीकरण, मुक्त बाजार, आयात निर्यातीवरील बंधने नष्ट परदेशी भांडवलाचे सहर्ष स्वागत अशी मुक्त अर्थ व्यवस्था देशात आणायची आहे. असे सरकारचे धोरण होते. तर निदान हे लोकांना त्यांची संमती तरी विचारायची भारत सरकारने देशातील सामान्य जनतेचा वापर हिताचा विचार करून जागतीकीकरणाची अंमलबजावणी करावयाची होती. अव्यस्था जागतीकीकरणामुळे भारताची सायकल हिरोहोंडा मोटार सायकलला जोडल्यास सारखे होवून भारताची फरपट होण्याचा धोका आहे जे अमेरिकाच्या हिताचे ते जगाच्या हिताचे यावर आपा विश्वास ठेवलचे कारण नाही.

जगतिकीकरणामुळे जग हे एक जागतिक खेडे झाले आहे. जागतिकीकरणाने गॅटस च्या माध्यमातून कृषी क्षेत्रावर ही आक्रमाण झाले म्हणून काळाच्या ओघात आपल्या कृषी क्षेत्रात बदल आवश्यक आहे म्हणूनच बदला अथवा मरा (Change of die) अशी वेळ आपल्यावर आली आहे. कारण जागतिकीकरणातून (Survival of the Featest) ही स्थिती प्राप्त झाली आहे. सामाजीक न्यायाचा विचार केला पाहिजे. जर खाजगीकरण ही हे गुणवत्ता सुधारण्याची संधी मानून गुणवत्तेचा ध्यास घेतला तर मा. राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना अपेक्षित असलेला भारत 2020 मध्ये विकसीत व समक्ष राष्ट्र म्हणून उदयास येईल.

संदर्भ –

1) योजना मासिक – माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार
2) दत्त सुंदरम – भारतीय अर्थव्यवस्था
3) रंजन कोळंबे – भारतीय अर्थव्यवस्था
4) अर्थ मंथन प्रकाशन – सकाळ पेपर्स लिमिटेड
5) कृषी धोरणाची भविष्य कालीन दिशा – डॉ. आर. एस. देशपांडे
6) ग्लोबलायजेशन ॲण्ड ॲग्रीकल्चर कायसेस इन इंडिया – अर्टीकल 2001
7) अर्थ बोध – मराठवाडा अर्थ परिषद 2006 व दैनिक लोकमत व दैनिक लोकसत्ता

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded